# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील हातदे - मिळंद या गावाला जोडणाऱ्या साकवाची दूरवस्था झाल्याबाबत

**(१) १२८९१ (०९-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील येथील हातदे - मिळंद या गावाला जोडणाऱ्या साकवाची दूरवस्था झाल्याने विद्यार्थी, ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे कळवूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६)** :(१), (२) व (३) सन २००२-०३ पूर्वी जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साकव दुरुस्तीसाठी ३०५४ मार्ग पूल परिक्षण व दुरुस्ती या योजनेत्तर संवर्गाखली साकव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत होता. परंतू तद्नंतर सन २००२-२००३ पासून संवर्ग अ ब क ड मध्ये साकव ही बाब अंतर्भूत होत नाही.

सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती हा योजनेत्तर कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि.१०.९.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधीचे वाटप करण्याबाबत कार्यपध्दती विशद केली आहे. त्यानुसार या योजनेत्तर कार्यक्रमासाठी गट अ ब क ड तयार केले असून गट ड मधील अन्य व संकिर्ण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेने साकव दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रमीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु. ७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

**अमरावती जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२) १६९७२ (०४-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात शेतकरी तसेच अपंगाचे प्रश्न कायम असताना जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या डागडुजीवर लाखो रुपये खर्च केले जात असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय निवासस्थानाला डागडुजीच्या नावाखाली संपूर्ण बदल करण्यात येत असून याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लाखो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) निवासस्थाने अत्यंत खराब असल्यामुळे ती दुरुस्त करणे आवश्यक होते. त्यामुळे निवासस्थान दुरुस्तीचे काम प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता तसेच, कार्यारंभ आदेश झाल्यानुसारच करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतर्गत असलेले नियम डावलून लाभार्थ्यांना मान्यता देऊन गैरव्यवहार करत असल्याबाबत**

**(३) १८०८४ (०४-०३-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगर हमी योजनेतर्गत नियमात न बसणा-या लाभार्थ्यांची निवड करुन ग्रामसभेची शिफारस नसलेल्या व दारिद्रयरेषेचा प्राधान्यक्रम डावलून गट विकास अधिकारी श्री.शिवाजी माने यांनी प्रशासकीय मान्यता देऊ गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार गट विकास अधिका-यांवर आतापर्यंत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) होय.

(२) रोहयोच्या कामांच्या संदर्भात अनियमितात असल्याचे सकृतदर्शनी आढळून आले आहे.

(३) संबंधित गट विकास अधिकारी यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दि.०५/०१/२०१६ च्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४) १८०८५ (०७-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेवसा ते आळंद महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात केलेला गैरव्यवहार व अनयिमितता याप्रकरणी सार्वजनिक उपविभागातील शाखा अभियंता श्री.पी.एस.देवरे व उपअभियंता यांची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार यांना माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी तपासणीत माहात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फुलंब्री तालुक्यातील शेवसा ते आळंद या रस्त्यांच्या कामाचे अनेक तुकडे करुन वित्तीय प्रशासकीय अधिकारी क्षेत्राबाहेर जाऊन तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे, रस्त्यांच्या कामामध्ये ६०.४० हे गुणोत्तर न राखता तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे, अकुशलचे काम पूर्ण न करता मोठ्या प्रमाणात कुशलचा निधी वितरीत करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत तत्कालीन शाखा अभियंता व तत्कालीन उपविभागीय अभियंता यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १.१२.२०१५ रोजी सादर करण्यात आला आहे. तसेच तत्कालीन तहसीलदार फुलंब्री यांचे विरुध्दसुध्दा विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्याचे निदेश तहसलदार फुलंब्री यांना जिल्हाधिकाऱ्यामार्फत देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(५) २८४२९ (१४-०१-२०१६) श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.वैभव पिचड (अकोला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेसाठी माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी पासून केंद्राने निधी न दिल्यामुळे सध्या सुरु असलेली १०४७ व प्रस्तावित कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण व प्रस्तावित कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) व (२) केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्रामसहक योजनेंतर्गत भाग-१ व भाग-२ साठी सुमारे रु.३००० कोटीचा कार्यक्रम मंजूर केला आहे. त्याकरीता केंद्र शरासनाने सन २०१४-१५ मध्ये रु.२०७ कोटी व सन २०१५-१६ मध्ये रु. ५५३.३० कोटी असा एकूण रु. ७६०.३० कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांच्या प्रमाणात कमी निधी केंद्रशासनाकडून प्राप्त झाल्याने योजनेच्या गतीवर परिणाम झाला आहे.

(३) राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शसनाकडे राज्यशासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यासोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरिता मा.मंत्री (ग्रामविकास) महोदया व मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दिनांक १ जून २०१५ रोजी मा.केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय ग्राम विकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. तसेच पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात येत असून मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.०१.०८.२०१५ च्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री व मा.केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

---

**तेर (जि.उस्मानाबाद) येथील यात्री निवासाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(६) २९२०३ (२०-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेर (जि.उस्मानाबाद) येथील संत गोरोबाकाकाचे पुरातन समाधी मंदिर असून हे ब दर्जाचे तीर्थक्षेत्र आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०११-१२ मध्ये पर्यटन विभागाकडून येथे यात्री निवास बांधकामासाठी निधी देण्यात येऊन झालेले बांधकाम अपुर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित कामासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. राज्य निकष समितीच्या दिनांक २६ डिसेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत सदर तीर्थक्षेत्रास “ब” वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
सन २०११-१२ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत "पर्यटनस्थळ विकासासाठी मुलभूत सुविधा करीता अनुदान" या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीमार्फत, श्रीसंत गोरोबा काका मंदिर, तेर, येथे दक्षिण आवारातील ओव्हरीचे बांधकाम करणे मंजूर करण्यात आले होते. सदर काम दिनांक ४ एप्रिल, २०१४ रोजी पूर्ण झाले आहे.
(३) सदर काम पूर्ण झाले असल्याने उर्वरित निधीची तरतूद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाकडून राज्यात राबविल्या जाणाऱ्या योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) २९२५९ (१६-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून राज्यात राबविल्या जाणाऱ्या योजनांना थेट निधी देणे बंद केल्याने पंतप्रधान ग्रामसडक योजना, सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवीन खोल्या बांधकामे व एआयबीपीतंर्गत येणारे प्रकल्प अडचणीत आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण जीवनाशी संबंधित असलेली ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेसाठी राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्यशासन स्तरावरुन पाठपुरवा करण्यात आलेला आहे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी मंजूर बांधकामे व उपलब्ध निधीच्या मर्यादेत वितरीत करण्यात येतो.

राज्याची अर्थोपाय स्थिती व मा.राज्यपालांचे निर्देश विचारात घेऊन एआयबीपीअंतर्गत प्रकल्पास निधी उपलब्ध करुन दिला जातो.

---

## नागपूर जिल्हा परिषद सामान्य प्रशासनाने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या संवर्गाच्या लाभाबाबत

**(८) २९३७१ (२२-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषद सामान्य प्रशासन हे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना संवर्गाचा लाभ न देता बनावट कर्मचाऱ्यांना संवर्गाचा लाभ देत असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सतत १५ वर्षे बनावट विमुक्त जाती-भटक्या जमाती कर्मचाऱ्यांना संवर्गाचा लाभ देऊन पात्र उमेदवारांना डावलण्याचा प्रकार जात पडताळणी समितीच्या निर्णयानंतर निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बनावट उमेदवारांच्या पदोन्नतीत सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी भटके-विमुक्त कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष यांनी मा.ग्रामविकास मंत्री व मा.सामाजिक न्याय मंत्री, समाजकल्याण आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) व (२) नाही. जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत सन २००५ साली श्रीमती अलका सुनिल खडतकर यांना परिचर पदावरुन कनिष्ठ सहायक पदावर विजाअ या राखीव प्रवर्गातून जात प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली होती.

तथापि, श्रीमती खडतकर यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने दि.१६/७/२०१५ रोजी त्यांना पुर्वीच्या परिचर वर्ग-४ पदावर पदावनत करण्यात आले आहे.
(३) होय.
(४) व (५) सदर प्रकरणी प्रशासकिय कार्यपध्दतीनूसार कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**हेर्ले ते वडगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) व तासगांव ते पेठगांव या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(९) ३०४७५ (२२-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेर्ले ते वडगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) व तासगांव ते पेठगांव या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) प्रश्नांकित रस्त्याची दुरवस्था झालेली नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नांकित रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार प्ररामा ६ पासून हर्ले मौ.वडगाव तासगाव ते वडगांव रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र. १९२ असून त्याची एकूण लांबी १०.५०० कि.मी. आहे. सदर रस्त्यांची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून सदर लांबीपैकी ०/०० ते १/०० कि.मी. व ३/०० ते ९/०० कि.मी. अशा एकूण ७.०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.

उर्वरित ३.५०० कि.मी खराब लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनेमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आंधळयाची वाडी (ता.केज, जि.बीड) येथे विहीरीच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(१०) ३२००९ (१४-०१-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनेक गावांमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीरी मंजूर करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्ययास, मौजे आंधळयाची वाडी (ता.केज, जि.बीड) येथे प्रत्यक्षात विहीरीचे काम न करता बनावट विहीरीचे काम दाखवून ११ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मौजे आंधळयाची वाडी ता.केज, जि.बीड येथे वैयक्तिक जलसिंचन विहिरी मंजूर करण्यात आलेल्या नाहीत. तथापि, गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांनी दि. २५/०४/२०११ व २८/०४/२०११ च्या आदेशा अन्वये अनुक्रमे ५ व ११ जलसिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदर जलसिंचन विहिरीवर मार्च २०१५ पर्यंत काहीही खर्च झालेला नसताना बनावट कार्यारंभ आदेश व संगणकीय प्रणालीमध्ये छेडछाड करुन ग्रामपंचायत आंधळेवाडी येथे झालेल्या गैरव्यवहाराबाबत गटविकास अधिकारी नरेगा यांच्या मार्फत चौकशी करुन दोषी आढळून आलेल्या तत्कालीन गटविकास अधिकारी, तांत्रिक अधिकारी (कंत्राटी), सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (कंत्राटी), २ डाटा एन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी) व ग्राम रोजगार सेवक पंचायत समिती केज यांचे विरुध्द पोलिस ठाणे केज येथे गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांनी दिनांक १/११/२०१५ रेजी एफआयआर क्रमांक २६६/२०१५ कलम ४६५, ४६८, ४७१, ४०८, ४०९, ४२०, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

तसेच सदर प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांनी पंचायत समिती केज येथील दोषी आढळून आलेल्या संबंधित १) कंत्राटी तांत्रिक अधिकारी श्री.व्ही.एम. घोळवे,
२) कंत्राटी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री.अमोल एम. जोगदंड, ३) डाटा एन्ट्री ऑपरेटर श्रीमती एस.डी.वायबसे व श्री.शेख जमिर, ४) श्री.एस.डब्ल्यु. रोटे या कंत्राटी तांत्रिक अधिकारी यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनुबाई-चिखली (जि.बुलढाणा) येथे बांधण्यात आलेल्या समाज मंदिराचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(११) ३४२७४ (१६-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनुबाई-चिखली (जि.बुलढाणा) येथे बांधण्यात आलेल्या समाज मंदिराचे काम निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन बांधण्यात आल्याबाबत ग्रामपंचायत सदस्य यांनी गुणनियंत्रक दक्षता समितीने चौकशी करण्याबाबत मा.मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे दिनांक २९ जून, २०१५ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार निकृष्ट कामाची चौकशी / पाहणी करण्यात आली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय. याबाबत प्राथमिक तपासणी करण्यात आली आहे.

सदरील काम हे जुन्या समाज मंदिर सभागृहाच्या दुरुस्तीचे काम आहे. जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बुलढाणा यांचे पाहणी अहवालानुसार समाज मंदिराच्या दुरुस्तीच्या कामामध्ये प्लॅस्टर व आरसीसी स्लॅबचे काम करण्यात आले. जुन्या व नवीन बांधकामामुळे जॉईंटमध्ये काही ठिकाणी प्लॅस्टरवर क्रॅक दिसून येतात. तथापि, आरसीसी स्लॅबचे काम व्यवस्थित आहे. समाज मंदिराचे काम सुस्थितीत असून समाजाकरीता त्याचा वापर होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील ५४ ग्रामसेवकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(१२) ३५०३९ (१६-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील ५४ ग्रामसेवकांचे वेतन मागील तीन महिन्यापासून थकित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थकित वेतन तातडीने देण्याकरिता या ग्रामसेवकांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी पासून असहकार आंदोलन पुकारले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ग्रामसेवकांचे वेतन थकित असण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच या ग्रामसेवकांचे थकित वेतन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) नाही.
(२) नाही. माहे जून ते ऑगस्ट, २०१५ या तीन महिन्यांचे थकित वेतन तातडीने मिळण्याकरीता व जोपर्यंत वेतन मिळत नाही, तोपर्यंत पंचायत समितीने मासिक/पाक्षिक सभेत बसणार नसलेबाबत ग्रामसेवक संघटनेने गट विकास अधिकारी यांना पत्र दिले होते.
(३) माहे जून, २०१५ पासून जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांचे वेतन पंचायत राज सेवार्थ प्रणालीमधून करण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. सदर प्रक्रिया त्यावेळेस प्राथमिक टप्प्यात असल्यामुळे ऑनलाईन वेतनाचे अनुदान पंचायत समिती, वरोरा यांचे स्तरावर उशीराने प्राप्त झाल्यामुळे जून व जुलै, २०१५ चे वेतन सप्टेंबर, २०१५ व ऑगस्ट, २०१५ चे वेतन ऑक्टोंबर, २०१५ मध्ये अदा करण्यात आले.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथील ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकाऱ्यांने सरपंचांना आर्थिक व्यवहार न सोपविल्याबाबत**

**(१३) ३५०४३ (१४-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील ग्रामपंचायतीच्या निवडणूका होऊन महिना उलटला तरी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी अद्यापही सरपंचांना आर्थिक व्यवहार सोपवित नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामपंचायतीने प्रस्ताव पारित करुनही ग्रामविकास अधिकारी मनमानी कारभार करीत असून त्यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार ग्रामविकास अधिकारी, श्री.विजय येरावार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही. अशी तक्रार जिल्हा परिषदेस प्राप्त झाली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून सुरू करण्यात आलेली ९ कामे ही निधी अभावी बंद असल्याबाबत**

**(१४) ३५६८५ (२०-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात दुर्गम गावे मुख्य रस्त्यांना जोडण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून सुरू करण्यात आलेली ९ कामे ही निधी अभावी बंद पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सन २०१४ पासून निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे योजनेतील सुमारे २२ कोटीची कामे बंद पडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) उक्त कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हयातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग २ मधील मंजूर ९ कामांपैकी ४ कामे भोतिकदृष्टया पूर्ण झालेली असून उर्वरीत ५ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामांवर आतापर्यंत रु.५५७.६९ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाकडून मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात निधी प्राप्त झालेला नसल्याने कामांच्या गतीवर परिणाम झालेला आहे.

(३) व (४) राज्याला आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्य शासन स्तरावरुन पाठपूरावा करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पूरेसा निधी उपलब्ध करुन देण्यंची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरीता मा.मंत्री (ग्रामविकास) महोदया व मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दि.१ जून, २०१५ रोजी मा.कैंद्रीय वित्त मंत्री व कैंद्रीय ग्रामविकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. तसेच पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात येत असून मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.१ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री व मा.कैंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

---

**जळगाव जिल्हयातील रावेर येथील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था**

**(१५) ३६०८५ (२२-१२-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील रावेर येथील आदिवासी भागातील ग्रामीण मार्ग ६९, ८८ व इतर जिल्हा मार्ग १६,९० या रस्त्यांची निधी अभावी दुरवस्था झालेली असल्याने वारंवार अपघात होत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) संपूर्ण राज्यमध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते त्यानुसार जळगाव जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८३३६.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ८३३०.०५ कि.मी. इतकी आहे.

रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१४-१५ या आर्थकि वर्षासाठी जळगाव जिल्हा परिषदेस एकूण रु २६२०.३१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये एकूण रु. ९८४.९९ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी जळगाव जिल्हा परिषदेला रु ५७४.४० लक्ष असा एकूण रु ४१७९.७० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. या उलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या या जास्त आहेत.

प्रश्नांकित रोझोदा फैजपूर ग्रामीण मार्ग क्र.६९, कळमोदा जानोरी ग्रामीण मार्ग क्र. ८८ लोहारा कुसुंबा उटखेडा विवरा ऐनपूर इरत जिल्हा मार्ग क्र. १६ व डोंगरकठोरा ते डोंगरदे देवस्थान इतर जिल्हा मार्ग क्र. ९० या रस्त्यांच्या मजबुतीकरणाची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

---

**येरखेडा (ता.कामठी, जि.नागपूर) ग्रामपंचायत हद्दीतील नाली बांधकामात गैरकारभार झाल्याबाबत**

**(१६) ३६२६७ (२०-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरखेडा (ता.कामठी, जि.नागपूर) ग्रामपंचायत हद्दीतील नाली बांधकामात ग्रामविकास अधिकारी किर्ती बोंद्रे व कनिष्ठ अभियंता स्मिता रासेकर यांनी गैरकारभार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) रविदास नगर येथे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत पाच लक्ष रु. सिमेंट कॉन्क्रेट नाली बांधकाम करायचे काम अपूर्ण असल्याने पूर्ण झाल्याचे खोटे उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामविकास अधिकारी किर्ती बोंदो व स्मिता रासेकर यांनी देऊन अनियमितता व कर्तव्यात कसुर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या संबंधाने जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

चौकशी अहवालानुसार तत्कालिन ग्रामसेवक व कनिष्ठ अभियंता यांनी पदाचा दुरुपयोग करुन कर्तव्यात कसूर केली आहे. त्यामुळे त्यांना निलंबित करण्यत आले असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आली आहे. तसेच संबंधितांविरुध्द पोलिस ठाणे, कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाडा (जि.पालघर) तालुक्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत

**(१७) ३७८५९ (१४-०१-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात प्रचंड वर्दळीचा रस्ता असलेल्या व मोठ्या प्रमाणात उद्योग धंदे असलेल्या कुडुस-कोढला हा १० किमीचा रस्ता असून यासाठी शासनाने पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत ४ कोटी ८३ लाख इतका निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून तेथील संबंधित ठेकेदार व अधिकारी यांनी संगनमताने गैरव्यवहार केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

अतिभाराच्या वाहनांच्या वाढलेल्या वर्दळीमुळे सा.क्र.२/१०० ते ४/०० दरम्यान रस्ता काही ठिकाणी दबला आहे. सदरचे काम सुरु असताना त्या कामाची तपासणी राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी केली असून सदर काम निर्धारित मानकानुसार असून त्यांचे शेरे समाधानकारक होते.

सा.क्र.०/०० ते ५/०० दरम्यान वाढलेली वाहतूक ध्यानात घेऊन त्यास अनुरुप धारण क्षमतेचा रस्ता बांधण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्तावित करण्यात आले आहे. त्याकरीता रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

### ठाणढुणी (ता.तिवसा, जि.अमरावती) या गावाचे पुनवर्सन अंतर्गत स्मशानभूमीकरीता संपादीत करण्यात आलेल्या शेतजमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(१८) ३८४८६ (२०-०१-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणढुणी (ता.तिवसा, जि.अमरावती) या गावाचे पुनवर्सन अंतर्गत स्मशानभूमीकरीता संपादीत करण्यात आलेल्या शेतजमिनीचा मोबदला वा पर्यायी शेतजमिन मिळण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनानुसार शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला वा पर्यायी शेतजमिन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०६-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

(२) ठाणढुणी (ता.तिवसा, जि.अमरावती) या गावाचे पुनवर्सन अंतर्गत स्मशानभूमीकरीता शासनाने चांदूर ढोरे येथील जमीन ८/४७/१९८५-८६ मौजा चादूर ढोरे, ता. तिवासा, अन्वये संपादीत केलेली होती. परंतु, विभागीय आयुक्त अमरावती, यांचे पत्र दि. ०५.०३.१९८८ अन्वये मौजा चांदूर ढोरे, ता.तिवसा, जि.अमरावती येथील श्री.साहेब लक्ष्मणराव तोटे यांची सर्व्हे नं.४०/२ मधील २.०२ हे आर. जमीन संपादनातून वगळण्यात आली असल्यामुळे वरील जमीन संपादनाविषयीची पुढील कार्यवाही रद्द करण्यात आली असल्याबाबत दि.८/४/१९८८ अन्वये संबंधितास कळविण्यात आले असून मा.विधान संभा सदस्यांना दि.२३.१०.२०१५ च्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्यातील मलकापूर मतदार संघातील मौजे रणगाव ते विवरा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१९) ३८५०१ (२०-०१-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्यातील मलकापूर मतदार संघातील मौजे रणगाव ते विवरा १ कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरिक, दुचाकी व चारचाकी वाहन चालकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या मजबुतीसाठी व डांबरीकरण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.पं. बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) जि.प.बांधकाम विभाग, बुलढाणाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्नांकित रणगांव ते विवरा हा रस्ता जिल्हा मार्ग क्र.३६ चा भाग रस्ता असून त्याची लंबी २/८०० कि.मी. आहे. प्रश्नांकित क्षतीग्रस्त रस्त्याच्या दुरुस्तीचे रु.९.७९ लक्ष रक्कमेचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. उर्वरित लांबीचे काम करण्याबाबत जिल्हा परिषदेकडील पत्र दिनांक २२/१/२०१६ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांना कळविण्यात आले आहे.

---

**नाशिक शहरात इंदिरा घरकुल योजनेअंतर्गत तयार केलेल्या सदनिकांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२०) ३९०६८ (२३-१२-२०१५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात इंदिरा घरकुल योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करुन तयार केलेल्या सदनिकांची दुरवस्था झाली असून शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत एकूण किती सदनिका तयार करण्यात आल्या आहेत या सदनिकांचा लाभ अद्याप अनेक नागरिकांना घेता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) इंदिरा आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेची अंमलबजावणी केली जाते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार इंदिरा आवास योजने अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटूंबांना घरकुल बांधकामासाठी अर्थसहाय्य दिले जाते. सदर प्रश्न नाशिक शहरातील इंदिरा घरकुल योजनेतील आहे. सदर योजना नाशिक शहरात राबवली जात नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी (जि.परभणी) पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२१) ३९१०५ (२२-०१-२०१६). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.गोपाळ यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गटविकास अधिकाऱ्याविरुध्द बदल्यांमध्ये तसेच इतर योजनांमध्ये गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गटविकास अधिकारी यापुर्वी हजेरीपटाच्या गैरव्यवहारात निलंबित झाले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गटविकास अधिकाऱ्यांविरुध्द अनेक तक्रारी असतानाही विभागीय चौकशी करण्यास व त्यास शिक्षा होण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(५) शासनाने सदर गटविकास अधिकारी तसेच त्यास संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय.
(२) सन २०१४-१५ मधील बदल्यांमध्ये गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी आहेत.
(३) नाही.
(४) श्री.गोपाळ, गट विकास अधिकारी यांच्याविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ तालुक्यातील ३९ ग्रामपंचायतींमध्ये महाऑनलाईन सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(२२) ४०३३७ (०४-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ तालुक्यातील ३९ ग्रामपंचायतींमध्ये दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी पासून महाऑनलाईन सेवा बंद झाल्याने विविध प्रकारचे दाखले आणि उतारे मिळविण्यासाठी तेथील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भुसावळ तालुक्यातील ३७ ऑपरेटर बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महाऑनलाईन सेवा पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) महाऑनलाईन ही ई-पंचायत/संग्राम प्रकल्पातील अंमलबजावणी यंत्रणा होती. १३ व्या वित्त आयोगातून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत होती. १३ व्या वित्त आयोगाची मुदत संपल्यामुळे महाऑनलईनने या प्रकल्पांतर्गत (डाटा एन्ट्रीसाठी) नेमलेल्या संगणक परिचालकां (VLE) चे सेवा करार दि.३१ डिसेंबर, २०१५ पासुन समाप्त केले आहेत. ग्रामपंचायत पातळीवर विविध सेवा दाखले देण्याची वैधानिक जबाबदारी संबंधित ग्रामसेवक व सरपंचाची आहे. त्यामुळे सेवा, दाखले वितरण सुरु आहे.

१४ व्या वित्त आयोगतील निधीतून ई-पंचायत/संग्राम प्रकल्पाचे सुधारित धोरण निश्चितचे काम निर्णयार्थ उच्च स्तरावर सादर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील संगणक परीचालकांना मुदतवाढ देण्याबाबत

**(२३) ४०४६२ (०४-०५-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाऑनलाईनच्या माध्यमामून मागील चार वर्षापासून राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या संगणक ऑपरेटरच्या कारारनामा ३१ डिसेंबरला संपल्याने त्यांची सेवा समाप्त झाल्याने राज्यातील सुमारे २५ हजार संगणक चालकांचे पाच महिन्यांचे ५६ कोटी २५ लाख रुपयांचे मानधन थकीत राहिल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गावामध्ये महाऑननलाईनमुळे ग्रामपंचायतीतून दाखले मिळत होते परंतू महाऑनलाईनच्या करारनामा संपल्याने राज्यातील ग्रामपंचायतीची कामे बंद झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार महाऑनलाईनच्या माध्यमातून ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या संगणक ऑपरेटरांचे थकीत मानधन देण्याबाबत तसेच ग्रामपंचायतीवर ऑफलाईनच्या नामुष्कीमुळे येणाऱ्या कामांची अडचण दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) ई-पंचायत प्रकल्पाची महाऑनलाईन ही अंमलबजावणी यंत्रणा आहे. या प्रकल्पावरील तांत्रीक मनुष्यबळ महाऑनलाईन कडून उपलब्ध करुन देण्यात आले होते. १३ व्या वित्त आयोगातील निधीतून या प्रकल्पाची अंमलबजावणी होत होती. १३ व्या वित्त आयोगची मुदत समाप्त झाल्याने महाऑनलाईनने दि.३१ डिसेंबर, २०१५ रोजी त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या तांत्रीक मनुष्यबळाचे (VLE) सेवाकरार समाप्त केले आहेत. महाऑनलाईनकडून जिल्हा परिषदांना देयक उशिरा देण्यात आली. सदर देयके अंतिम असल्याने तपासणी व ताळमेळांअतीच अदायगी करणे आवश्यक होते. त्यामुळे सदर देयकांची अदायगी ताळमेळ व तपासणीअंती करण्यात आली.

(२) नाही.

दाखले देण्याची वैधानिक जबाबदारी संबंधित ग्रामसेवक व सरपंचांचीच असल्याने दाखले देण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

(४) व (५) महाऑनलाईनने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाचा मोबदला अदा करण्याची वैधानिक जबाबदारी महाऑनलाईनची आहे. जिल्हा परिषदांकडून महाऑनलाईनला देयके अदायगी करण्यात आली आहेत. महाऑनलाईनने या प्रकल्पावरील मनुष्यबळाचा मोबदला तातडीने अदा करण्याबाबत शासनाने महाऑनलाईनला निर्देशित केले आहे. चौदाव्या वित्त आयोगातील निधी व मार्गदर्शक सूचनांनुसार ई-पंचायत/संग्राम प्रकल्पाच्या सुधारीत धोरण निश्चित करुन त्याच्या अंमलबजावणीचा प्रस्ताव शासनाच्या उच्च स्तरावर निर्णयार्थ आहे.

---

**ग्रामीण भागाच्या विकासासाठी १४ व्या वित्त आयोगानुसार राज्यभरातील ग्रामपंचायतींना द्यावयाच्या विकास निधी प्राप्त होवूनही विकासाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ४०५९१ (०५-०५-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागाच्या विकासासाठी १४ व्या वित्त आयोगानुसार राज्यभरातील ग्रामपंचायतींना द्यावयाच्या विकास निधीचे २ हप्ते जिल्हा परिषदांना प्राप्त होवून देखील माहे डिसेंबर २०१५ हा महिना संपला तरीही ग्रामपंचायतींना न मिळाल्यामुळे राज्यभरातील ग्रामपातळीवरील विकासाची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) एकीकडे राज्य शासनाकडून विकास कामांच्या विविध घोषणा होत आहे आणि ग्रामविकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नसल्याचे सांगितले जात असले तरीही राज्यभरातील वास्तव्य भीषण असल्याने ग्रामीण भागातील जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोटयवधीचा निधी संबंधित ग्रामपंचायतींना वितरीत न करता राज्यातील जिल्हा परिषदांकडे पडून असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, जिल्हा परिषदेकडे आलेला विकास निधी विनाविलंब ग्रामपंचायतींना वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार चौदाव्या वित्त आयोगांतर्गत पहिल्या आर्थिक वर्षाच्या (सन २०१५-१६) बेसिक ग्रँटच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी करावयाचा विनियोग, त्याचे नियोजन व संनियंत्रण याबाबतच्या धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु होती. त्यामुळे सदर मार्गदर्शक सूचना निर्गमित होईपर्यंत सदर अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये असे निर्देश दि.१६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले होते.

चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्रिय वित्त मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना दि.८ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सन २०१५-१६ या पहिल्या आर्थिक वर्षाच्या जनरल बेसिक ग्रँटच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतीनी घ्यावयाची कामे, नियंत्रण इ. संबंधीचा सविस्तर धोरणात्मक निर्णय ग्राम

विकास विभागाने दि.२१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केला आहे. त्यानुसार सदर निधी खर्च करण्याकरिता ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टाकीपठार,आपटे खरीड, कानवे ते मूगाव येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२५) ४०७१४ (०४-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टाकीपठार, आपटे खरीड, कानवे ते मूगाव अशा १०.१७५ किमीच्या अंतराच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूरी देण्यात आली असून सदरहू एमडीआर ६३ या रस्त्यांसाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास यंत्रणेकडून ५० कोटी २ लाख ८ हजार ७२१ रूपयांचे अर्थसहाय्य मिळाले असून ५ वर्षे दुरूस्ती देखभालीसाठी ५ कोटी ३ लाख २३ हजार १३७ रूपये इतका निधी प्राप्त झाला असून दिनांक २८ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास सदरहू रस्त्यांचे काम सुरू झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यांचे मातीकाम (३६७४६ मी) जीएसबी (५०३.१५ मी) खडीकरण (ग्रेड २-४४६३१ मी) डांबरीकरण, कारपेट, सीलकोटसह (३२२२५ मी) क्रीटीकरण (१८५० मी) व एकूण १५ मोठ्या असे कामांचे स्वरूप असलेला हा रस्ता ठाणे येथील आर्वी कंन्स्ट्रक्शन कंपनीला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठेकेदार व अधिकारी यांच्या निष्काळीपणामुळे पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत सुरू असलेले सदर काम प्रलंबित असून रस्त्याची दुरवस्था झाल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रस्त्यांची झालेली दुरवस्था, प्रलंबित काम यामुळे प्रवाशांच्या गैरसोयीबाबत तेथील ग्रामस्थांनी सातत्यांने मागील १ वर्षापासून उपअभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना, ठाणे परिसर, कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद सार्वजनिक बांधकाम विभाग, मा.ग्रामविकास मंत्री आदीकडे लेखी निवेदनाद्‌वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशी अंती काय आढळून आले,
(६) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
तथापि प्रश्नांकित कामाची निविदा किंमत रु.५ कोटी २८ हजार असून ५ वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ५३,२३,१२७/- एवढी रक्कम मंजूर आहे.
(२) सदर रस्त्याचे काम मे.आर.व्ही. कन्स्ट्रक्शन कंपनी, ठाणे यांना दिले आहे.

(३) केंद्र शासनाकडून राज्यास मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात अत्यल्प निधी प्राप्त झाल्यामुळे योजनेतील कामांच्या गतीवर परिणाम झाला आहे.
(४) प्रश्नांकित रस्त्याची खडी उखडल्याची तक्रार दि.२५ जानेवारी, २०१६ रोजी प्राप्त झाली आहे. तद् नंतर सदर रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून सदर कामाकरिता अद्यापपर्यंत रु.२३३.२३ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
(५) व (६) राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी सदर काम समाधानकारक अभिप्राय दिले आहेत. सद्यस्थितीत सदर रस्त्याचे काम सुरु करण्यात आले असून पावसाळ्यापूर्वी सदर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

**केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या पंचायत राज सशक्तीकरण आणि यशवंत पंचायतराज अभियान या दोन्ही योजना स्वतंत्रपणे राबविण्याबाबत**

**(२६) ४०७४६ (०४-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायतराज संस्थाच्या सक्षमिकरणासाठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या पंचायत राज सशक्तीकरण आणि यशवंत पंचायतराज अभियान या दोन्ही योजना स्वतंत्रपणे राबविण्याचा निर्णय नुकताच राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयावर अमंलबजावणी केव्हा पर्यंत होण्याचे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) केंद्र शासनाने पंचायत राज सशक्तीकरण पुरस्कार या योजनेचे निकष व स्वरुप बदलेले असून, केंद्र शासनाने सन २०१५-१६ ऑनलाईन प्रश्नावली विहित केली आहे. त्यामुळे यशवंत पंचाय राज अभियान ही योजना स्वतंत्रपणे राबविण्याचा शासन दि १८ नोव्हेंबर, २०१५ अन्वये घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी सन २०१५-१६ पासून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या योजनेमध्ये सन २०१४-१५ मधील आर्थिक वर्षात केलेल्या अत्युकृष्ट कामगिरीच्या अनुषंगाने पंचायत राज संस्थांना पुरस्कार देण्यात आले आहेत. राज्य स्तरावर एकंदरीत ९ पुरस्कार (जिल्हा परिषद-३, पंचायत समिती-३ व ग्रामपंचायत-३) व विभाग स्तरावर एकंदरीत ३६ (पंचायत समिती-१८ व ग्रामपंचायती-१८) इतके पुरस्कार देण्यात आले.

---

**हंसराज नगर (ता.खामगाव, जि. बुलढाणा) या भागाचा मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२७) ४१४५८ (२०-०४-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंसराज नगर या भागाचा मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीकडे समावेश करण्याबाबत या परिसरातील नागरिकांनी व स्थानिक वि.प.स. लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील अनुक्रमे सर्वे नं. १४२,१४४,१४५,१४७,१४८,१४९,१५० या सलग सर्वे नं मध्ये एकूण १८०० लोकवस्ती आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी काढलेल्या अधिसूचना क्र. /कवी/राजस्व -७/ कली /५४४/२०१५ दि. ५/०८/२०१५ वर हंसराज नगर या भागातील नागरिकांनी हरकती घेतल्या आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या हरकती नुसार हंसराज नगर हा भाग स्वतंत्र्य ग्रामपंचायत म्हणून घोषित न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, या मागणीनुसार सदर परिसर मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीत समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नमूद सर्वे नं. मधील लोकसंख्या अंदाजे १८०० इतकी आहे. या परिसरातील १४४, १४७, १४८, १४९ हे सर्वे नं सलग आहेत. मात्र १४२, १४५, १५० सर्वे नं. सलग नाहीत.

(३) व (४) प्रारुप अधिसूचना दि. ५ ऑगस्ट, २०१५ बाबत तीन आक्षेप / हरकती प्राप्त झाल्या असून, प्राप्त तीनही हरकती निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

नव्याने मसहूली गाव म्हणून घोषित झालेल्या खामगांव ग्रामीण या महसूली गावामध्ये हंसराज नगर या भागाचा समावेश असून शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी, २००४ नुसार स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी स्वतंत्र महसूली गाव या घटकाचा विचार करण्यात येत असल्यामुळे हंसराज नगर हा भाग स्वतंत्र ग्रामपंचायत म्हणून घोषित करता येत नाही.

(५) व (६) भौगोलिक सलगतेच्या अभावामुळे हंसराज नगर हा भाग जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करता येत नाही.

तथापि, हंसराज नगर सह संजीवनी कॉलनी संत तुकाराम कॉलनी, गोपाळकृष्ण कॉलनी इ. भागासाठी दि. २६.१०.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये "खामगांव ग्रामीण" या नावाने महसूली गांव स्थापन झाले असून, "खामगांव ग्रामीण" या महसूली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या अनुषंगाने सदर भागाला महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ४ अन्वये स्वतंत्र गाव म्हणून घोषित करण्याबाबतची अधिसूचना दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

## १४ व्या वित्त आयोगाचा सुमारे ४८ लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद, अहमदनगर यांना मिळण्याबाबत

**(२८) ४२०९३ (०५-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वतीने संयुक्तपणे देण्यात येणाऱ्या १४ व्या वित्त आयोगाचा सुमारे ४८ लाख रुपयांचा निधी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये जिल्हा परिषद, अहमदनगर यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधी संदर्भात सरकारकडून मार्गदर्शन केलेले नसल्याने हा निधी ग्रामपंचायत पातळीवर वर्ग करता येत नसल्याचे जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागाने दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने आतापर्यंत जि.प.स मार्गदर्शन संबंधीत निधी ग्राम पंचायतीकडे वर्ग करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ एप्रिल, २०१५ ते दिनांक ३१ मार्च, २०२० या कालखंडात केंद्र शासनाकडून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला बेसिक ग्रँट व परफॉर्मन्स ग्रँट या २ प्रकारच्या ग्रँट्सच्या स्वरुपात अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. प्रस्तुत निधी हा केवळ ग्रामपंचायत स्तरासाठीच उपलबध करण्यात येणार आहे. चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा बेसिक ग्रँटचा पहिला हप्ता दिनांक १६/७/२०१५ व दुसरा हप्ता दिनांक ३/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांना (ग्रामपंचायत स्तराकरीता) वितरीत करण्यात आला आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्हा परिषदेस दोन्ही हप्त्यांचे मिळून एकूण रुपये ९५ कोटी १६ लाख इतक्या निधीचे वितरण करण्यात आले आहे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सदर निधीच्या विनियोगासंबधी कार्यपध्दती विषद करणारा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असल्याने असा शासन निर्णय निर्गामित होईपर्यंत सदर अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये, अशा सूचना ग्राम विकास विभागाने दि.१६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये दिल्या होत्या.

(३) चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत शासनाच्या मार्गदर्शक सूचना दि.८ ऑक्टोबर, २०१५ रोजी प्राप्त झाल्या. त्या विचारात घेऊन पहिल्या आर्थिक वर्षाच्या (सन २०१५-१६) बेसिक ग्रँटच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी करावयाचा विनियोग, त्याचे नियोजन व संनियंत्रण याबाबतच्या मार्गदर्शक सूचना ग्राम विकास विभागाने दिनांक २१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार सदर निधी खर्च करण्याकरिता ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत जिल्ह्यातील एकूण १९ रस्त्यांची कामे सुरु करण्याबाबत**

**(२९) ४२१६४ (२८-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत जिल्ह्यातील एकूण १९ रस्त्यांची निवड करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निर्णय घेवून निवडण्यात आलेल्या रस्त्यांची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) रत्नागिरी जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-१७ साठी निवड करण्यात आलेल्या एकूण १९ रस्त्यांपैकी ५ रस्त्यांची निविदा प्रक्रिया सुरु असून उर्वरित १४ रस्त्यांच्या सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पीआरआय प्रकल्पांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(३०) ४२५३७ (०३-०५-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पीआरआय प्रकल्पांतर्गत कार्यरत आलेले जिल्हा समन्वयक, सॉफ्टवेअर इजि., जि.प.प.स. संगणक परिचालक यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत महाराष्ट्र राज्य (संगणक तज्ञ) जि.पं./प.स संग्राम कर्मचारी संघटना, जि.अहमदनगर यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार संगणक परिचालक यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे.

काही जिल्ह्यातील (संगणक तज्ञ) जिल्हा परिषद/पंचायत समिती संग्राम कर्मचारी संघटना (नियोजित) यांनी निवेदने दिली आहेत. तथापि महाराष्ट्र राज्य सं.ग्रा.म (संगणकीय ग्रामिण महाराष्ट्र) कर्मचारी संघटना (स्तर-जि.प./पं.स), जि.अहमदनगर यांचे डिसेंबर, २०१५

मध्ये संगणक परिचालक यांना शासन सेवेत घेण्याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि या संघटनेने दि. ५.४.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांना संग्राम-२ प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत निवेदन विभागाला दि. २०.४.२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) १४ व्या वित्त आयोगातील निधी वापरुन ई-गर्व्हर्नन्सच्या अनुषंगाने कामकाज करण्याबाबतच्या पंचायती राज मंत्रालयाच्या सुचना डिसेंबर, २०१५ अखेर प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार संग्राम प्रकल्प अंमलबजावणीचे सुधारित धोरण शासनाच्या उच्च स्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्ह्यांमध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३१) ४२६०० (०३-०५-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदूरबार व जळगाव जिल्ह्यात पंतप्रधान सडक योजनेत गैरव्यवहार झाला असून ठेकेदारांनी निकष आणि मानके डावलून कामे केली असतानाही त्यांची बिले काढण्यात आली असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावतीसह सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी विकास कामांवर खर्च करण्यासाठी जिल्हापरिषदेना मार्गदर्शक सूचना देण्याबाबत**

**(३२) ४२९४९ (०३-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अमरावतीसह सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी बेसिक ग्रॅन्ट दोन्ही हप्त्यांचे मिळून

सुमारे १.६२३ कोटी ३२ लाख रुपये जिल्हापरिषदेकडे जमा असले तरी ही रक्कम खर्च कशी करायची याबाबत शासनाने कोणत्याही मार्गदर्शक सूचना केल्या नसल्याने हा निधी वापराविना पडून असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी विकास कामांवर खर्च करण्यासाठी जिल्हापरिषदेना मार्गदर्शक सूचना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) दिनांक १६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरित करताना, सदर निधीच्या विनियोगासंबंधी कार्यपध्दती विशद करणारा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असल्याने असा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत सदर अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये, अशा सूचना प्रस्तुत शासन निर्णयान्वये देण्यात आल्या होत्या.
(२) चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये प्राप्त झाल्या आहेत. प्रस्तुत मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, चौदाव्या वित्त आयोगाच्या पहिल्या आर्थिक वर्षाच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी घ्यावयाची विकास कामे त्याचे नियोजन व कामे घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती या संदर्भातील मार्गदर्शक सूचना ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दिनांक २१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार सदर निधी खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऑडिटर्सनी नोंदविलेल्या अहवालातील उणीवा दूर करण्याबाबत**

**(३३) ४३०६० (२९-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदांमार्फत राबविलेल्या शासनाच्या योजनांमध्ये तब्बल १ लाख २६ हजार ५२९ कोटी ७२ लाख रुपये अडकून पडले असल्याचे स्थानिक निधी लेखा विभागाच्या अहवालात नोंदविण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ऑडिटर्सनी नोंदविलेल्या या अहवालातील उणीवा दूर करण्याबाबत तसेच स्पष्टीकरण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. स्थानिक निधी लेखा परिक्षा नवी मुंबई यांच्या दि. १९/०३/२०१६ च्या पत्रामध्ये सदर अहवालातू मुद्रण चूक झाल्याचे नमूद करुन सद्य:स्थितीमध्ये राज्यात जिल्हा परिषदांमार्फत राबविलेल्या शासन योजनांमध्ये सन १९६२-६३ ते २०१२-१३ अखेर रु. १२ हजार २५४ कोटी ३७ लाख गुंतले असल्याचे नमुद केले आहे.

(२) स्थानिक निधी लेखा विभागाच्या लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट आक्षेपांची अपुनपालने सादर करण्याची कार्यवाही निरंतर चालू असते. संबंधित जि.प. कडून आक्षेपांवर कार्यवाही करुन अनुपालने सादर केली जातात व स्थानिक निधी विभागाकडून आक्षेप मान्य केल्यास त्या लेखा आक्षेपामध्ये गुंतलेली रक्कम आक्षेपाधिन राहत नाही. शासन स्तरावरुनही प्रलंबित परिच्छेद निकाली काढण्याबाबत सातत्याने सूचना दिल्या जातात. मा.प्र. सचिवांच्या KRA मध्येही या मुद्यांचा अंतर्भाव करण्यात आला असून प्रलंबित परिच्छेद निकाली काढण्यबाबत सातत्याने आढावा घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) च्या विकास आराखड्यास निधीसह मंजूरी देण्याबाबत

**(३४) ४३०८० (०३-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज जन्मस्थळ, लोणी (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) च्या विकास आराखड्यास निधीसह मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास व प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडेही दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विकास आराखड्यास निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर आराखड्यात नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक ४ जून, २०१५ अन्वये जिल्हास्तरीय समित्यांची मान्यता आवश्यक आहे. सबब, सदर आराखडा जिल्हास्तरीय समित्यांच्या मान्यतेने शासनास सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती व मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ४३२६७ (०३-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्यात तीन हजार कोटीचे रस्ते मंजूर करण्यात आले असून आतापर्यंत अवघे ३०० कोटीचा निधी मिळाल्याने या रस्त्यांच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते व पूल उभारणीसाठी उपयुक्त ठरलेल्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या निधी वाटपात अपेक्षित निधी दिला नसल्यामुळे कंत्राटदारांनी कामे बंद केली असल्याने अनेक कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित निधी केंद्र शासनाकडून मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१३-१४ मध्ये एकूण रु. ३००४ कोटीचा कार्यक्रम मंजूर असून त्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात केंद्र शासन व राज्य शासनाकडून एकूण रु. ७२९.६८ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

(२) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर कार्यक्रमाच्या प्रमाणात कमी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्याने योजनेच्या कामावर परिणाम झाला आहे.

(३) व (४) राज्यात आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्य शासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

---

**वेंगसर-बौध्दवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील अरुणा नदीवरील पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३६) ४४५६७ (२१-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगसर-बौध्दवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील अरुणा नदीवरील पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाकरिता प्रधानमंत्री ग्रामसडक योजेनेतंर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था सिंधुदुर्ग अंतर्गत मंजूर होऊन दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ साली नवीन पुलाच्या बांधकामाला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली होती त्यापैकी पुलाचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून ३० टक्के काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त गावातील ग्रामस्थांचे पुलाअभावी हाल होत असून त्यांना नदी पार करतांना शारिरिक कसरत करावी लागत असल्यामुळे पुलाचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी वेंगसरचे माजी सरपंच व ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे खासदार तसेच संबंधितांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू पुलाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०६-२०१६) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर पुलाच्या ५ गाळ्यांपैकी ३ गाळ्याचे काम पूर्ण झाले असून आतापर्यंत सदर कामास रु. ९३.२६ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर काम प्रगतीपथावर आहे.

---

### ग्रामीण भागाच्या विकासासाठी १४ व्या वित्त आयोगानुसार राज्यभरातील ग्रामपंचायतीना द्यावयाच्या विकास निधीबाबत

**(३७) ४४६१३ (०३-०५-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागाच्या विकासासाठी १४ व्या वित्त आयोगानुसार राज्यभरातील ग्रामपंचायतीना द्यावयाच्या विकास निधीचे दोन हफ्ते जिल्हा परिषदांना प्राप्त होऊन देखील माहे डिसेंबर, २०१५ महिना संपत आला तरी ग्रामपंचायतींना निधी न मिळाल्याने राज्यभरातील ग्रामपातळीवर विकासाची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) व (२) दि. १६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरित करताना, सदर निधीच्या विनियोगासंबंधी कार्यपध्दती विशद करणारा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असल्याने असा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत सदर अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये अशा सूचना प्रस्तुत शासन निर्णयान्वये देण्यात आल्या होत्या.

चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दि. ८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये प्राप्त झाल्या आहेत. प्रस्तुत मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, चौदाव्या वित्त

आयोगाच्या पहिल्या आर्थिक वर्षाच्या वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी घ्यावयाची विकास कामे त्याचे नियोजन व कामे घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती या संदर्भातील मार्गदर्शक सूचना ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दि. २१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर निधी खर्च करण्यास अनुमती देण्यात आली असून ग्रामपंचायतीकडून खर्चाचे नियोजन करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील खालापूर पंचायत समितीच्या इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ४४६१४ (२१-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील खालापूर पंचायत समितीच्या इमारतीचे काम पाच वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पंचायत समिती इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) खालापूर पंचायत समिती प्रशासकीय इमातीचे बांधकाम पुर्ण झाले असून इमारत वापरात आणण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन थकित असल्याबाबत**

**(३९) ४५२३५ (०३-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर, २०१५ पासून चे वेतन थकित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांचे थकित वेतन तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१६) :**(१) अशी बाब नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याकरिता "पत्रावळी" तयार करणारे यंत्र नादुरुस्त असल्याबाबत**

**(४०) ४५३०१ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याकरिता "पत्रावळी" तयार करणाऱ्या यंत्राचे वाटप केले त्या यंत्रातून पत्रावेळी ऐवजी द्रोण बाहेर येऊ लागल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने दोषींवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
सन २०१४-१५ मध्ये स्वनिधीतून अपंग व्यक्तींना ८४ नग, पत्रावळी मशिन खरेदी केल्या असून, मशिन सोबत पत्रावळी व द्रोण असे दोन साचे पुरविण्यात आले आहेत. प्राप्त साहित्याची तांत्रिक तपासणी झालेली असून पात्र लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप झालेले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कवडदरा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) गावामध्ये स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४१) ४५५३३ (३०-०४-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कवडदरा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) गावाला कवडदरा- भरवीर ही ग्रुप ग्रामपंचायत असून कवडदरा गाव स्वतंत्र ग्रामपंचायत होण्याकरीताचे सर्व निकष पूर्ण करत असून गावाला ग्रुप ग्रामपंचायत मधून स्वतंत्र करुन वेगळ्या ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

ग्रामपंचायत भरविर खुर्द मधून विभाजन करुन कवडदरा येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नाशिक या कार्यालयाच्या दिनांक ०६/०३/२०१४ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांचेकडे सादर करण्यात आला होता.

तथापि, तत्कालिन परिस्थितीमध्ये ग्रामपंचातीची मुदत संपण्यास सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक राहिलेला असल्यामुळे, निवडणूक आयोगाच्या सुचनांनुसार सदरील प्रस्ताव शासनास सादर करता येणार नसल्यामुळे विभागीय आयुकत कार्यालय, नाशिक विभाग यांनी दिनांक ११ मार्च, २०१४ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे परत पाठविला आहे.

ग्रामपंचायत भरविर खुर्दचे विभाजन करुन कवडदरा येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर करण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४२) ४६३५५ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील औंढा नागनाथ येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याविरुध्द मोठया प्रमाणात तक्रारी असून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून विभागीय चौकशीचा उचित प्रस्ताव मागविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्य बिल्डर्स असोसिएशन यांच्या मागण्याबाबत**

**(४३) ४८०३१ (२९-०४-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य बिल्डर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी मा. वित्त मंत्री तसेच अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभागाला दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आपल्या मागण्याचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनात कोणत्या मागण्या केल्या आहेत,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०६-२०१६) :**(१) नाही. निवेदन अप्राप्त आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांना**
**मागील तीन महिन्यांचे मानधन देण्याबाबत**

**(४४) ४८१५५ (२९-०४-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे मागील तीन महिन्यांचे मानधन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात जवळपास ५०० संगणक परिचालक कार्यरत आहेत त्याचे एकूण १ कोटी रुपयांचे महाऑनलाईन कंपनीकडे मानधन थकित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संगणक परिचालक संघटनेतर्फे अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देवूनही जिल्हा प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनूसार मानधन निधी कंपनीला न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) नाही.

(२), (३), (४), (५) व (६) महाऑनलाईन कडून जिल्हा परिषदेला देयके विलंबाने सादर करण्यात आली. तसेच महाऑनलाईनच्या देयकांचे अंतीम स्वरुपात प्रदान असल्याने जिल्हा परिषद व महाऑनलाईनच्या ताळमेळाअंती देयक अदा करण्यात आली. तसेच महाऑनलाईनकडून संगणक परिचालक (VLE) ना डिसेंबर, २०१५ पर्यंतचा मोबदला अदा करण्यात आलेला आहे.

---

**मौजे तळवडे (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या रस्ते दुरुस्तीचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४५) ४८१८९ (०४-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तळवडे (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या रस्ते दुरुस्तीचे काम कंत्राटदाराने अपूर्ण ठेवल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग उत्तर, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २४ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास उपअभियंता, उपविभाग, खेड यांस अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत ठेवलेल्या कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) सदर काम कंत्राटदाराने अपूर्ण ठेवल्याचे माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आले होते व त्याच महिन्यात काम पूर्ण झाले आहे.

(२) होय.

(३) व (४) काम पूर्ण करुन रस्ता वाहतूकीस योग्य केलेला असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत जळगांव ग्रामीण रस्त्यांची कामे अपूर्ण निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ४८२६३ (३०-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत जळगांव ग्रामीण रस्त्यांसाठी ५६ कोटीच्या निधीपैकी केवळ १३ कोटीचा निधी आतापर्यंत प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण निधी अभावी या रस्त्यांची कामे थांबली असून काही कामे संथगतीने सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निधी मिळण्याकरिता वारंवार पाठपुरावा करुनही निधी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा निधी तातडीने मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना-२ अंतर्गतच्या जळगाव जिल्ह्यातील एकूण रु. ५६.२० कोटीच्या कामांना आतापर्यंत रु. ३१.२२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांच्या प्रमाणात कमी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्याने योजनेच्या कामावर परिणाम झाला आहे.
(३), (४) व (५) राज्यात आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनाकडे राज्य शासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने सन २०१५-१६ मध्ये रु. ५५३.३० कोटी निधी राज्यात वितरीत केलेला आहे.

---

**मागासवर्गीयांना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीमार्फत स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) ४८२९४ (३०-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागासवर्गीयांना स्वयंरोजगाराकरिता वस्तूंच्या चक्की, मंडप साहित्य, शेवया मशिन, पिको-फॉलि मशिन अशा प्रकारे वस्तूंचे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीमार्फत वाटप करुन त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) जळगांव जिल्हा परिषदेच्या उत्पादनातून समाजकल्याण विभागाला २० टक्के रक्कम दिली जात असून त्यातून समाजकल्याण समिती या मागासवर्गीयांच्या निधितून विद्युत इलेक्ट्रीक हायमास्ट लॅम्प जास्तीच्या प्रमाणात घेत असून यामुळे मागासवर्गीयांचा निधी कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे मागासवर्गीयांच्या निधीतून विद्युत पथदिव्यांच्या खरेदीवर काही मर्यादा आणून मागासवर्गीयांना वैयक्तिकरित्या रोजगार उपलब्ध करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) होय.
(२) जिल्हा परिषदेच्या २०% निधीतून वैयक्तिक तसेच सामुहिक स्वरुपाच्या योजना जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने घेण्यात आलेल्या असून सर्व निधी मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात आला असल्याने मागावर्गीयांचा निधी कमी झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील शिराळा मतदार संघातील खेड (धनगरवाडा) आणि पांचुब्री येथे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत सुरु असलेल्या पुलाच्या बांधकामाबाबत**

**(४८) ४८३३६ (३०-०४-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील शिराळा मतदार संघातील खेड (धनगरवाडा) आणि पांचुब्री येथे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंतर्गत पुल बांधण्याकरिता मे. प्रिती संगम कन्स्ट्रक्शन, कराड या संस्थेस मंजूर निविदेपेक्षा २०% जादा रक्कम देवून काम दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकामासाठी कमीतकमी देकार हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २०% जास्त असल्यामुळे व केंद्रशासनाकडून रुपये १ कोटी १७ लाख ८८ हजार व राज्य शासनाकडून रुपये १४ लाख ९२ हजार इतकी हिश्यांची रक्कम मंजूर करण्यात यावी अशी शिफारस अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्य अभियंता, प्रधानमंत्री गामसडक योजना, मुंबई यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तृत प्रकरणी अधिकची रक्कम मंजूर करण्याकरिता आदेश देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री महोदयांना दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी निविदेची ज्यादा रक्कम राज्य शासनाच्या बचतीतून करण्याबाबतचा प्रस्ताव दि.१८.२.२०१६ च्या शासन पत्रान्वये राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास संस्थेत (NRRDA) मान्यतेस्तव पाठविण्यात आला आहे.

---

**कोथळज रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४९) ४८३६४ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोलीपासून काही अंतरावर असलेल्या कोथळज रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने गावकऱ्यांना ये-जा करण्यास गैरसोयीचे होत असल्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती व्हावी अशी ग्रामस्थांची मागणी असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कोथळज येथे मुख्य रत्यावरुन जाण्याकरीता दोन मार्ग असून त्यापैकी ग्रामीण मार्ग ४० हा जिल्हा मुख्यालयासाठी जवळचा मार्ग असून त्याची गावापर्यंत जाण्यासाठी एकूण लांबी ३.०० कि.मी. एवढी आहे. सदर रस्ता खडीचा असून वाहतुक योग्य आहे. परंतु सदर रस्त्यावर कयाधु नदीवर नवीन मोठ्या पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु असल्याने वाहतुक बंद आहे. कोथळज गांवाकरीता ग्रामीण मार्ग -४० चा भाग दुसरा पर्यायी मार्ग असून तो गावापासून ते जिल्हा मुख्यालयांपर्यंत डांबरी असून सुस्थितीत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत कयाधु नदीवर प्रगतीत असलेल्या पुलाचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याचे पोच मार्ग व रस्त्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषानुसार प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**औरंगाबाद, वैजापूर, गंगापूर, सिल्लोड, कन्नड, सोयगाव व खुलताबाद (जि.औरंगाबाद) पंचायत समित्यांचा अखर्चित निधी पंचायत समित्यांना पुन्हा देण्याबाबत**

**(५०) ४९००३ (३०-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद, वैजापूर, गंगापूर, सिल्लोड, कन्नड, सोयगाव व खुलताबाद (जि.औरंगाबाद) या ८ पंचायत समित्यांनी गेल्या ३ वर्षातील अखर्चित केलेला निधी जिल्हा परिषदेच्या तिजोरीत जमा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत व सदर अखर्चित निधी सदर पंचायत समित्यांनी पुन्हा देण्याबाबत जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने शासनाकडे परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०६-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) जिल्हा परिषदेने अखर्चित निधी खर्च करण्याबाबतच्या शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने सन २०१५-१६ मध्ये मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.